॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com


* सुविचार *

माणसाला शत्रू नसणे ही अशक्यप्रायः गोष्ट आहे.


■ अहिल्यानगर ■ सोमवार, दि. ६ एप्रिल २०२६ ■ वर्ष ६ वे ■ अंक ३२१ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145


# कामगारांच्या अर्जित रजेचे दरवर्षी रोखीकरण होणार

## नवीन कामगार संहिता २०२५ ने या महत्त्वपूर्ण समस्येवर कायमस्वरूपी तोडगा

**● मुंबई । वीरभूमी –** कार्यालयीन कर्मचाऱ्यांची अर्जित रजा अनेकदा न वापरताच संपून जाते, अशी एक प्रमुख तक्रार आहे. मात्र, नवीन कामगार संहिता २०२५ ने या महत्त्वपूर्ण समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढला आहे. या नवीन कायद्यामुळे कामगार वर्गाला मोठा दिलासा मिळाला आहे. पूर्वी कर्मचाऱ्यांना त्यांच्या शिल्लक रजेचे पैसे मिळविण्यासाठी नोकरी सोडण्याची, निवृत्त होण्याची किंवा कामावरून काढून टाकण्याची वाट पाहावी लागत असे. आता ते दरवर्षी त्यांच्या अतिरिक्त रजेचे रोखीकरण करू शकणार आहेत.



नवीन नियमांनुसार अर्जित रजेसाठी पात्र होण्याकरिता कर्मचाऱ्यांना आता जास्त काळ वाट पाहावी लागणार नाही. जुन्या कारखाना कायद्यानुसार २४० दिवस सलग काम करणे अनिवार्य होते. नवीन कामगार संहितेने ही मर्यादा केवळ १८० दिवसांपर्यंत (अंदाजे सहा महिने) कमी केली आहे. याचा अर्थ असा की, जर एखाद्या कर्मचाऱ्याने एका कॅलेंडर वर्षात सलग १८० दिवस सेवा केली, तर तो पगारी रजेसाठी पात्र आहे. हा बदल देशभरात एकसमानपणे लागू केला जाईल. ज्या राज्यांमध्ये आधीपासूनच चांगले नियम अस्तित्वात आहेत, तेथील कर्मचाऱ्यांना त्या चांगल्या नियमांचा फायदा मिळत राहील.

अनेकदा असे घडते की, एखादा कर्मचारी रजेसाठी अर्ज करतो, परंतु कंपनी किंवा बॉस कामाच्या मर्यादांचे कारण देऊन तो अर्ज नाकारतात. जुन्या पद्धतीनुसार याचा अर्थ कर्मचा-याची रजा वाया गेली असती. नवीन कामगार संहिता २०२५ ने हा अन्याय पूर्णपणे दूर केला आहे. त्यात एक अत्यंत महत्त्वाची सुरक्षा जोडली आहे. जर एखाद्या कर्मचाऱ्याने रजेची विनंती केली आणि मालकाने ती नाकारली, तर ती रजा रद्द होणार नाही. त्याऐवजी ती कोणत्याही कमाल मर्यादेशिवाय पुढील वर्षासाठी पुढे नेली जाईल. हा नियम सुनिश्चित करतो की, कर्मचाऱ्यांना यापुढे कंपनीने अनिवार्य केलेल्या कोणत्याही जबाबदाऱ्यांमुळे रजा गमावण्याचे परिणाम भोगावे लागणार नाहीत.

या नवीन कामगार संहितेचे सर्वात आकर्षक वैशिष्ट्य म्हणजे वार्षिक रोखीकरण सुविधा. तज्ज्ञांच्या मते, कर्मचारी आता जास्तीत जास्त ३० दिवसांची रजा पुढील वर्षासाठी पुढे नेऊ शकतात. जर एखाद्या कर्मचाऱ्याने ३० दिवसांपेक्षा जास्त रजा जमा केली, तर ते त्या अतिरिक्त रजेसाठी भरपाईचा दावा करू शकतात. शिवाय वर्षाच्या शेवटी कर्मचारी त्यांच्या सर्व जमा झालेल्या रजेचे रोख रकमेत रूपांतर करण्याचा दावा करू शकतात.

नवीन कामगार संहितेचे हे आकर्षक फायदे सर्वांसाठी उपलब्ध नाहीत. हे प्रामुख्याने अशा कामगारांसाठी तयार केले आहे जे शारीरिक, अकुशल, कुशल, तांत्रिक, परिचालन किंवा लिपिकीय कामे करतात आणि ज्यांचा मासिक पगार १८ हजारपेक्षा कमी आहे. जर एखादा कर्मचारी दरमहा १८ हजारपेक्षा जास्त कमावणारा पर्यवेक्षक असेल किंवा व्यवस्थापकीय किंवा प्रशासकीय पदावर असेल तर त्यांना या संहितेअंतर्गत हे विशिष्ट फायदे मिळणार नाहीत. विशेष म्हणजे जोपर्यंत तुमच्या राज्यात अंमलबजावणी होत नाही, तोपर्यंत जुन्या नियमांनुसार कार्यरत राहू शकते.

## SPOT NEWS

### उद्धव ठाकरेंचा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांना पाठिंबा

**● मुंबई –** बारामती विधानसभेच्या पोटनिवडणुकीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार सुनेत्रा अजित पवार यांना पाठिंबा दिल्याची माहिती राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी दिली आहे. बारामती विधानसभेची जागा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूमुळे रिक्त झाली आहे. या ठिकाणी २३ एप्रिल रोजी पोटनिवडणूक होणार आहे. अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा पवार उद्या सोमवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी आपला उमेदवारी अर्ज भरतील. सुनेत्रा पवार यांनी शनिवारीच ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याशी फोनवरून चर्चा करून निवडणुकीत पाठिंबा देण्याची विनंती केली होती. त्यानंतर ठाकरेंच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले होते. पण आता राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी ठाकरे या निवडणुकीत आपला उमेदवार देणार नसल्याचे स्पष्ट केले आहे.

### निमगाव भोजापूर येथील दोघा बोगस डॉक्टरवर कारवाई

**● संगमनेर –** तालुक्यातील बोगस डॉक्टर आरोग्य विभागाच्या रडारवर आल्याचे पाहायला मिळत आहे. निमोण नंतर निमगाव भोजापूर येथील दोघा बोगस डॉक्टरांवर शनिवारी (दि. ४) दुपारी बारा वाजेच्या सुमारास कारवाई करीत गुन्हा दाखल केला आहे. यामुळे विनपरवाना वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे. याबाबत संगमनेर तालुका पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी, की निमगाव भोजापूर येथे शैलेश किसनराव कडलग आणि प्रवीण गंगाधर कवडे हे साईलीला रिहॅबिलिटेशन सेंटर चालवून लोकांवर औषधोपचार करत असल्याची माहिती तालुका आरोग्य अधिकारी डॉ. कामेश टावरे यांना मिळाली. त्यानुसार जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना माहिती देऊन आरोग्य सेवक अरविंद काळे व आरोग्य सहाय्यक अर्जुन मंडलिक यांच्यासह तालुका आरोग्य अधिकारी डॉ. टावरे यांनी संबंधित सेंटरवर छापा टाकला. त्यावेळी तेथे डॉ. प्रवीण कवडे यांची ओपीडी व आयपीडी आढळून आली. तर काही मुदत संपलेली औषधे सापडली.

## 'रवींद्र एरंडे'च्या अडचणीत वाढ; ८ पीडित महिलांची ओळख पटली

**● नाशिक । वीरभूमी –** एकीकडे नाशिकमधील वासनांध भोंदू अशोक खरात याच्या महिला लैंगिक शोषण प्रकरणाने देशात खळबळ उडालेली आहे. या प्रकरणाचा तपास सुरु असतानाच त्याची पुनरावृत्ती शहरातील सातपूर येथे उघडकीस आली आहे. तथाकथित पत्रकार असलेल्या रवींद्र एरंडेच्या टॅब व हार्डडिस्कमधून महिलांच्या लैंगिक अत्याचाराचे तब्बल १२१ व्हिडिओ पोलिसांच्या हाती लागले आहेत.

रवींद्र एरंडे याच्याकडून पोलिसांनी आतापर्यंत ४ मोबाईल फोन जप्त केले असून, त्यातील 'डाटा' रिकव्हर करण्याचे काम सुरु आहे. तसेच या प्रकरणात पोलिसांनी आठ पीडितांची ओळख पटविल्याने एरंडे विरोधात तक्रारीत वाढ होण्याची शक्यता आहे. दरम्यान, एरंडेची पोलिस कोठडी संपत असल्याने त्यास सोमवारी (दि. ६) न्यायालयात हजर केले जाणार आहे. त्यामुळे या सुनावणीकडे नाशिककरांचे लक्ष लागून आहे.

रवींद्र गणपत एरंडे याच्या शहरातील अशोक नगर भागात असलेल्या कार्यालयाची शनिवारी रात्री पोलिसांनी झडती घेतली होती. 'न्यायवैधक'च्या पथकाने एरंडेच्या कार्यालयातून तांत्रिक पुरावे गोळा केले आहेत. तसेच, त्याच्या टॅब व हार्डडिस्कमधून पोलिसांच्या हाती लागलेल्या महिलांच्या लैंगिक शोषणाचे व्हिडिओ तपासून पाहिले जात आहेत. पोलिसांनीही यातील काही महिलांची ओळख पटविली असली तर यातील काही महिलांशी पोलिसांचा अद्याप संपर्क झालेला नाही. पोलिसांनी एरंडेच्या ताब्यातून ४ मोबाईल, २ पेनड्राइव्ह आणि १ मेमरी कार्ड जप्त केले आहे.

पीडित महिलांना पोलिसांकडून विश्वासात घेतले जात आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत एरंडे याच्या विरोधात आणखी गुन्हे दाखल होण्याची शक्यता आहे. पीडित महिलांनी पोलिसांशी संपर्क साधावा असे आवाहन केले आहे. एका महिलेने त्याच्याविरोधात तक्रार दिली आहे. मुलाला नोकरी लावून देतो असे आमिष दाखवून त्याने महिलेवर अत्याचार केले. तीचे छुप्या रितीने व्हिडीओ काढले. याच पद्दतीने तो महिलांना ब्लॅकमेल करत असल्याचे समोर आले आहे. पीडितेच्या तक्रारीनंतर पोलिसांनी त्याला अटक केली.

## खरातची ईडीमार्फतही चौकशी

### ट्रान्झेक्शन तपासणार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती

**● नाशिक । वीरभूमी –** भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात आता ईडीकडूनही चौकशी होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. तसेच अशोक खरातच्या गैरकृत्यात सहभागी झालेल्या कुणालाही सोडणार नाही, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. अशोक खरातचे जे वेगवेगळ्या प्रकारचे ट्रान्झेक्शन आहे ते आम्ही शोधून काढत आहोत, असे ते म्हणाले.

अशोक खरातची संपूर्ण संपत्ती, त्याचे सर्व गैरव्यवहार आणि त्यांनी महिलांवर ज्याप्रकारे गैरवर्तन केले, त्या सर्व प्रकरणांची खोलवर चौकशी करून त्याला कठोरात कठोर शिक्षा देवू. मला असे वाटते की, याबाबत महाराष्ट्रात सर्वांचे एकमत आहे. आमच्यासाठी तर कारवाई ही राजकारणाच्या पलिकडे आहे. पण काही लोक या प्रकरणावरूनही राजकारण करताना दिसत आहेत. पण आम्ही अशा प्रकारच्या राजकारणाला महत्त्व देत नाही. सरकारला जी कारवाई करायची आहे ती सरकार करेल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. पुरोगामी विचार मंच

या प्रकरणात १२ गुन्हे दाखल झाले आहेत. रोज नवी माहिती समोर येत आहे. आता एसआयटी काय तपास करते हे रोज सांगता येणार नाही. एसआयटी योग्य वेळी माहिती देईल. मला असे वाटते की, आपल्याला एसआयटीवर विश्वास ठेवावा. एसआयटी उत्तम कार्य करत आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

अशोक खरातसंबंधी ईडीने सर्व काही माहिती घेतलेली आहे. त्यांनीही कारवाई सुरू केलेली आहे. एकदा जमीन आयडेन्टीफाय झाली की नियमानुसार त्यात जे-जे करायचे ते आम्ही करू. त्यामुळे या प्रकरणाची निश्चितपणे ईडी चौकशी होईल, असे मुख्यमंत्री म्हणाले.

# ॲसिड हल्ला पीडितेस शासन सर्वतोपरी मदत करणार

## महिला व बालविकास मंत्री कु. आदिती तटकरे । पीडित मुलीशी व तिच्या कुटुंबीयांशी साधला संवाद

**● शिर्डी । वीरभूमी –** संगमनेर तालुक्यातील वडगावपान येथील सिड हल्ल्यातील पीडित मुलीची महिला व बालविकास मंत्री कु. आदिती तटकरे यांनी रविवारी लोणी येथील प्रवरा रुग्णालयात जाऊन भेट घेतली. या अत्यंत निंदनीय घटनेतील पीडित मुलीच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे आहे आणि तिच्या पुढील उपचारांचा संपूर्ण खर्च शासन करेल, अशी ग्वाही कु. तटकरे यांनी दिली.

रुग्णालयात उपचार घेत असलेल्या या मुलीची प्रकृती सध्या स्थिर आहे. मात्र, तिचे वय लहान असून त्वचा संवेदनशील असल्याने तिला आणखी काही दिवस उपचारांची तसेच एका शस्त्रक्रियेची आवश्यकता आहे. डॉक्टर व प्रशासन तिची पूर्ण काळजी घेत आहेत. मुलीचे विशेष समुपदेशकाकडून समुपदेशन करण्यात आले असून, स्थानिक डॉक्टरांच्या मदतीने हे समुपदेशन पुढेही प्रभावीपणे सुरू ठेवण्याबाबत चर्चा झाली आहे.

पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे, या उपचारांचा कोणताही आर्थिक भार पीडितेच्या कुटुंबावर पडू दिला जाणार नाही. पीडितेस महिला व बालविकास विभागाच्या 'मनोधैर्य' योजनेअंतर्गत एक लाख रुपयांचे आर्थिक साहाय्य तात्काळ देण्यात येईल. यासोबतच, न्याय विभागाच्या 'व्हिक्टिम कॉम्पेन्सेशन स्कीम २०२२' अंतर्गत तिच्या कुटुंबाला तातडीची मदत म्हणून ३ लाख रुपये आधीच देण्यात आले आहेत.

घटनेच्या दिवसापासूनच आपण पोलीस अधीक्षकांच्या संपर्कात असल्याचे सांगून मंत्री तटकरे म्हणाल्या, स्थानिक आमदारांनीही हा मुद्दा सभागृहात मांडला होता. सध्या आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांचा तपास वेगाने सुरू असून, विविध यंत्रणांची मदत घेतली जात आहे. कुटुंबाकडे काही अतिरिक्त माहिती असल्यास ती पोलिसांना द्यावी, तसेच त्यांच्या काही अपेक्षा असल्यास त्या सांगाव्यात, असे आवाहनही त्यांनी केले.

या सांत्वनपर भेटीदरम्यान पीडित मुलीच्या कुटुंबातील तिची आई, मावशी व मामा उपस्थित होते. तसेच, आमदार काशिनाथ दाते, आमदार अमोल खताळ, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे आणि जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संजय कदम हेही याप्रसंगी उपस्थित होते.



# SPOT NEWS

## सुरेशनगर शिवारात एसटी बसच्या धडकेत दुचाकीवरील दाम्पत्य ठार

**● नेवासा । वीरभूमी–**
अहिल्यानगर छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील सुरेशनगर शिवारात एसटी बसने दिलेल्या धडकेत दुचाकीवरील नेवासा तालुक्यातील माळीचिंचोरे येथील वृद्ध दाम्पत्याचा मृत्यू झाल्याची घटना शनिवारी सायंकाळी घडली. याबाबत माहिती अशी की, अहिल्यानगर–छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील सुरेशनगर शिवारात हॉटेल शिनाईसमोर छत्रपती संभाजीनगर–कोल्हापूर या एसटी बसने (एमएच १४ एमएच ४३८४) दुचाकीला जोरदार धडक दिली. यात नेवासा तालुक्यातील माळीचिंचोरा येथील फिलिप दाविद वाघमारे व मार्थाबाई फिलिप वाघमारे हे पती–पत्नी जागीच ठार झाले. शनिवारी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास हा अपघात घडला. नेवासाफाटा येथील फिलिप वाघमारे आणि मार्याबाई वाघमारे हे जोडपे आपल्या संपूर्ण कुंटूबियांसोबत छत्रपती संभाजीनगर येथे एका लग्न समारंभाला जाऊन आल्यानंतर पुन्हा सायंकाळी ७ वाजेच्या दरम्यान नेवासाफाटा येथून आपल्या दुचाकीवरून माळीचिंचोरेकडे जात असताना पाठीमागून येणाऱ्या छत्रपती संभाजीनगर–कोल्हापूर या बसने दुचाकीला जोराची धडक दिली. यात हे जोडपे जागीच ठार झाले. रुग्णवाहीका चालक विकास निपुंगे यांनी तात्काळ घटनास्थळी पोहचून जखमींना नेवासाफाटा येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता वैद्यकिय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेमुळे माळीचिंचोरा आणि परिसरात मोठी हळहळ व्यक्त होत असून या दुर्दैवी अपघाताच्या घटनेमुळे गावं बंद ठेऊन त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

## खंडोबा देवस्थान ‘क’ वर्ग करण्यासाठी प्रयत्नशील : आ. अमोल खताळ

**● संगमनेर । वीरभूमी–**
तालुक्याच्या पठारभागातील सावरगाव घुले येथील खंडोबा देवस्थान हे परिसरातील भाविकांचे प्रमुख श्रद्धास्थान असून, या देवस्थानाचा ’क’ वर्गात समावेश होणे आवश्यक आहे. यासाठी येणाऱ्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीमध्ये पाठपुरावा केला जाईल, असा विश्वास आमदार अमोल खताळ यांनी ग्रामस्थांना दिला. खंडोबा देवस्थानच्या यात्रोत्सवानिमित्त आमदार खताळ यांनी भेट देत महाआरती केली. यावेळी त्यांनी ग्रामस्थांशी संवाद साधला. कार्यक्रमास देवस्थानचे अध्यक्ष सीताराम घुले, सचिव गोरक्षनाथ मदने, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे तालुकाध्यक्ष चंद्रकांत घुले, उपसरपंच नामदेव घुले, व्यापारी अमित राठी, सोसायटीचे अध्यक्ष संतोष घुले, भानुदास बोऱ्हाडे, बाबासाहेब कडू, शरद घुले, सचिन घुले, बाळासाहेब घुले, बन्सी मदने यांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आमदार खताळ यांच्या हस्ते बैलगाडा शर्यतीत प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल मधुकर घुले यांचा सन्मानचिन्ह व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. आमदार खताळ म्हणाले, या देवस्थानाचा ’क’ वर्गात समावेश यापूर्वीच व्हायला हवा होता. मात्र वन विभागाच्या काही तांत्रिक अडचणींमुळे हा प्रस्ताव प्रलंबित राहिला. आता या अडचणी दूर करून संबंधित सर्व विभागांशी समन्वय साधत देवस्थानाला ’क’ वर्गाचा दर्जा मिळवून देण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न केले जातील. अकलापूर आणि सावरगाव घुले या भागात बैलगाडा शर्यतीची परंपरा सर्वप्रथम सुरू झाली असून आजही ती जतन केली जात आहे ही अभिमानाची बाब आहे. गावात टँकरमुक्त झाल्याचा फलक पाहून समाधान वाटले.

## देवगावात आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे यांच्या

# पुतळ्याच्या चौथऱ्याची अज्ञाताकडून तोडफोड

### अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल; आमदार डॉ. किरण लहामटे यांची घटनास्थळी भेट

**● अकोले । वीरभूमी –**
तालुक्यातील देवगाव येथील आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे यांच्या पुतळ्याच्या चौथऱ्याची अज्ञात इसमाने तोडफोड केल्याची घटना शनिवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास घडली. या प्रकरणी राजूर पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली असून, पोलिसांकडून संशयिताचा शोध सुरू आहे. दरम्यान, या घटनेचा सर्व स्तरातून निषेध व्यक्त करण्यात येत आहे. आमदार डॉ. किरण लहामटे यांनीही घटनास्थळी भेट देत तीव्र निषेध नोंदवला व नागरिकांना शांतता राखण्याचे तसेच प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले.



या संदर्भात पोपट काळू चौधरी (रा. धामणवण) यांनी राजूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीत त्यांनी नमूद केले की, शनिवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास सुधाकर भांगरे यांचा त्यांना फोन आला व देवगाव येथील राघोजी भांगरे यांच्या पुतळ्याच्या चौथऱ्यावरील ग्रॅनाइट कोणी तरी फोडल्याची माहिती मिळाली. त्यानंतर त्यांनी तातडीने घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता चौथऱ्याची तोडफोड झाल्याचे निदर्शनास आले.

चौधरी यांच्या फिर्यादीवरून पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती पोलिसांनी दिली. घटनेची माहिती मिळताच राजूर पोलीस ठाण्याचे सपोनि किशोर पवार हे आपल्या पथकासह घटनास्थळी दाखल झाले.

दरम्यान, आमदार डॉ. किरण लहामटे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. हे कृत्य समाजात तेढ निर्माण करून अशांतता पसरविण्याच्या उद्देशाने करण्यात आल्याचे स्पष्ट दिसत असल्याचे त्यांनी सांगितले. संबंधित आरोपींचा लवकरात लवकर शोध घेऊन त्यांच्यावर कडक कारवाई करण्याच्या सूचना त्यांनी पोलीस प्रशासनाला दिल्या.

उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे यांनीही दुपारी साडेतीनच्या सुमारास घटनास्थळी भेट देत परिस्थितीची पाहणी केली व संबंधित यंत्रणेला आवश्यक सूचना दिल्या.

## ह्युम मेमोरियल चर्चच्या वतीने ईस्टर संडे निमित्त विशेष उपासना



**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
अहमदनगर पहिली मंडळी (काँग्रीगेशनल) ह्युम मेमोरियल चर्चच्या वतीने ईस्टर संडे निमित्त विशेष उपासना आयोजन करण्यात आले.

या भक्तीचे मंडळींचे आचार्य रेव्ह. डॉ. सनी पी. मिसाळ यांनी भक्ती उपासना चालवत तसेच कोल्हापूर चर्च कौन्सिलचे रेव्ह. श्रीकांत बी. पठाणे यांनी पुनरुथीत ख्रिस्त गाजवत सर्व भाविकांनी मोठ्या आवाजात म्हणत होते. प्रभू उठला आहे, तो खरोखर उठला आहे. या घोषणा देण्यात आल्या यावेळी मंडळीचे सेक्रेटरी नंद प्रकाश शिंदे, खजिनदार प्रकाश सूर्यवंशी, अमोल काळे, सागर घोडके, राजेश ओहळ राजेश उजागरे, प्राची थोरात, संगीत सोनवणे यांच्यासह विश्वस्त मंडळी व तरुण संघ व ख्रिस्त बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एचटीबीटी बियाण्यांवरील बंदी उठवा

### अनिल घनवट यांची मागणी । कृषी विभागाच्या कारवाईवर टीका

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**
महाराष्ट्रात कपाशीच्या एचटीबीटी बियाण्याच्या वाढत्या प्रसारावर नियंत्रण ठेवण्यासाठी कृषी विभागाने कारवाईची भूमिका घेतली असली, तरी ही भूमिका शेतकऱ्यांवर अन्यायकारक असल्याची टीका स्वतंत्र भारत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल घनवट यांनी केली आहे.



एचटीबीटी बियाण्यावरील बंदी उठवून प्रगत बियाण्यांना त्वरित परवानगी द्यावी, अशी मागणी त्यांनी कृषी आयुक्तांना पाठविलेल्या निवेदनातून केली आहे. कृषी आयुक्तांनी राज्यात एचटीबीटी बियाण्याची लागवड रोखण्यासाठी समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला असून, यासाठी जिल्हाधिकारी व पोलीस यंत्रणेची मदत घेण्याची तयारी दर्शविली आहे. मात्र, ही कारवाई शेतकऱ्यांसह कापड उद्योग आणि शासनाच्या हितालाही बाधक ठरणारी असल्याचे घनवट यांनी नमूद केले आहे.

विदर्भ आणि मराठवाडा भागात मान्सूनवर आधारित कपाशीची लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते. मजूर टंचाई आणि वाढत्या मजुरीमुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक ताण सहन करावा लागतो. एचटीबीटी बियाण्यामुळे तण नियंत्रण सुलभ होत असून उत्पादन खर्च कमी होतो आणि उत्पन्नात वाढ होते, असा दावा त्यांनी केला आहे.

घनवट यांनी गुजरात राज्याचा दाखला देत, तेथे एचटीबीटी बियाण्याची खुलेआम विक्री होत असताना महाराष्ट्रातच बंदी का, असा सवाल उपस्थित केला. अधिकृत परवानगी नसल्यामुळे शेतकऱ्यांना निकृष्ट बियाणे मिळण्याचा धोका वाढतो आणि पावती नसल्यामुळे फसवणुकीविरुद्ध दादही मागता येत नाही, असेही त्यांनी नमूद केले.

तसेच, सरकारने एचटीबीटीबरोबरच व्हीआयपी–३ जनुकांचीही तपासणी करावी आणि प्रतिबंधित जनुक आढळल्यास संबंधित कंपन्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. महाराष्ट्रात जीएम बियाण्यांच्या चाचण्यांवर असलेली बंदी ही शेतीच्या प्रगतीस अडथळा ठरत असल्याचे सांगत, राज्याने केंद्र सरकारकडे यासाठी सकारात्मक शिफारस करावी, असे आवाहन घनवट यांनी केले.

एचटीबीटी बियाण्याच्या समर्थनार्थ आंदोलन सुरूच ठेवणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, कृषीमंत्री आणि पर्यावरणमंत्र्यांना पाठविण्यात आल्या आहेत.

# अहिल्यानगर शहरासाठी प्रगतीचे व्हिजन असणे अत्यंत महत्त्वाचे

### उपमहापौर धनंजय जाधव । सीताराम सारडा विद्यालयात निवडीबद्दल सत्कार

**● अहिल्यानगर। वीरभूमी–**
अहिल्यानगर महानगरपालिकेत सर्वानुमते उपमहापौरपदी निवड झाल्याबद्दल हिंद सेवा मंडळाच्या सीताराम सारडा विद्यालयात धनंजय जाधव यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना जाधव यांनी अहिल्यानगर शहराच्या विकासासाठी सदैव तत्पर असून पुढील काही वर्षाचे व्हिजन समोर ठेवून आम्ही सर्वजण काम करणार आहोत. शहराचा विकास हा एकमेव हेतू डोळ्यासमोर ठेवून शहरवासीयांच्या प्राथमिक गरजांसोबत शहरात तरुणांना समोर ठेवून नाविन्यपूर्ण उद्योग आणि उपक्रम राबविण्याचा मानस असल्याचे सांगितले. सर्वांना सोबत घेऊन केवळ नगर विकास हाच एक ध्यास मनाशी बाळगून हे पद स्वीकारल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले.

या प्रसंगी त्यांनी विद्यालयाच्या एआय कॉम्प्युटर लॅब ला भेट दिली. नव्याने नूतनीकरण करून सुरू करण्यात आलेल्या कम्प्युटर लॅबचे आणि विद्यार्थ्यांनी तयार केलेली विविध इलेक्ट्रॉनिक उपकरणे पाहताना उपमहापौर धनंजय जाधव यांनी ए आय हे भविष्य असून, शिक्षण क्षेत्रात ए. आय. चा उपयोग अत्यंत महत्त्वाचा असणार आहे. यासाठी शालेय स्तरावरच विद्यार्थ्यांना या प्रशिक्षणामुळे त्यांचे करिअर आणि भविष्य हे नक्कीच उज्वल असेल असे प्रतिपादन केले.

स्कूल कमिटीचे चेअरमन अजित बोरा यांनी धनंजय जाधव यांना पुढील कामासाठी शुभेच्छा देतानाच जाधव हे नेहमी आमच्या शाळेच्या प्रत्येक उत्तम कार्यात पाठीशी असल्याचे सांगितले. त्यांचे हिंद सेवा मंडळाशी कौटुंबिक नाते असून शाळेसाठी, संस्थेसाठी संपूर्ण कुटुंब नेहमीच अग्रेसर असते हे आवर्जून सांगितले.

हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी यांनी आपल्या शुभेच्छा मध्ये धनंजय जाधव हे नगरमध्ये एक आदर्श नेतृत्व असल्याचे सांगून सर्वांना सामावून घेणार व्यक्तिमत्व आहे. त्यांचे नेहमीच हिंद सेवा मंडळाला सहकार्य असते असे आवर्जून सांगितले.

विविध ॲक्टिव्हिटी विद्यार्थ्यांनी कराव्यात यासाठी स्वतंत्र ॲक्टिव्हिटी हॉल, भव्य लायब्ररी आणि विद्यार्थी रमतील, खेळतील अशी जिम, विविध स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र विद्यालयात सुरू करणार असल्याचे मुख्याध्यापक अशोक डोळसे यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत करताना सांगितले.



यावेळी शालेय समिती सदस्य संजय मुदगल, ईश्वर बोरा, ॲड. दीपक शर्मा, सचिन चोपडा, ज्योतीताई कुलकर्णी, मुख्याध्यापक अशोक डोळसे, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे, शिक्षक प्रतिनिधी दीपक आरडे, सौ. दिपाली लगड, शिक्षकेतर प्रतिनिधी गोवर्धन पांडुळे, आदी मान्यवर उपस्थित होते.

विद्यालयात ५० विद्यार्थ्यांचा सक्षम एनसीसी ग्रुप, विविध कलागुणांना वाव देणारे भव्य कलादालन याचबरोबर विविध खेळात यश मिळविण्यात अग्रेसर असणारा क्रीडा विभाग विद्यालयात उत्तम काम करत असल्याचे पर्यवेक्षिका सौ नंदा कानिटकर यांनी आपल्या आभार प्रदर्शनात सांगितले. कार्यक्रमासाठी विनोद जोशी, संजय शेकडे, चंद्रशेखर वाघ, अमोल कदम, आनंद जोशी, सौ. निमा राहिंज, सौ वृषाली जोशी, सौ. क्रांती मुंदानकर, सौ. वाघमारे, भाऊसाहेब बडगे, मोठ्या संख्येने पालक सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वृंद आणि माजी विद्यार्थी उपस्थित होते.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर– ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# SPOT NEWS

## खिरविरे येथे भैरवनाथ यात्रेनिमित्त भव्य डांगी जनावरांचे प्रदर्शन उत्साहात

**● अकोले । वीरभूमी –**

अकोले तालुक्यातील खिरविरे येथे भैरवनाथ यात्रा उत्सव मंडळ व मुंबईकर यांच्या संयुक्त विद्यमाने श्री भैरवनाथ यात्रा उत्सव भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. दरवर्षीप्रमाणे भव्य डांगी जनावरांचे प्रदर्शन उत्साहात पार पडले. घोडसरवाडी(समशेरपुर) येथील लक्ष्मण रामा घोडसरे यांचा वळू यंदाचा चॅम्पियन ठरला. खरविरे पंचक्रोशीतील ग्रामस्थांकडून चॅम्पियन वळूचे सर्वत्र कौतुक होत आहे. भैरवनाथ नवचैतन्य प्रतिष्ठान ग्रामस्थ खिरविरे यांनी श्री खेड भैरवनाथ येथुन ज्योत मिरवणूक काढण्यात आली. सकाळी डांगी जनावरांचे खरेदी विक्री व्यवहार नोंदणी केली. त्यानंतर रात्री देवाचा जागर भैरवनाथ प्रसन्न जागरण गोंधळ पार्टी पाडोशी यांचा मल्हारीचा कार्यक्रम झाला.भगवान भैरवनाथ मांडवाचा कार्यक्रम व क्रांतीज्योती सावित्रीबाई ज्योतिबा फुले महिला लेझीम पथक आकर्षक ठरले. जाणता राजा मित्र मंडळातर्फे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. भव्य अशी भगवान भैरवनाथ व जोगेश्वरी मुखवटे काठीचा मिरवणूक काढण्यात आली. रात्री अश्विनी पुणेकर सोबत बाळासाहेब बेल्हेकर लोकनाट्य तमाशा मंडळाचा बहारदार असा कार्यक्रम साजरा झाला. त्यानंतर भव्य डांगी जनावरांची स्पर्धा बक्षिस वितरण तसेच भव्य जंगी कुस्ती हंगामा संपन्न झाला.यावेळी पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून यात्रा उत्सव भक्तीमय वातावरणात साजरा केला. यावेळी उपस्थित पंचक्रोशीतील ग्रामस्थ तरुण मित्र मंडळ महिला वर्ग उपस्थित होते.

## शेती महामंडळ कामगारांना थकीत वेतनाचा दिलासा

**● श्रीरामपूर । वीरभूमी–**

शेती महामंडळाच्या कामगारांना दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या वेतनाच्या मुद्यावर अखेर न्याय मिळाला असून औद्योगिक न्यायालयाने कामगारांच्या बाजूने महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. न्यायमूर्ती समिना खान यांनी दि. १६ मार्च २०२६ रोजी दिलेल्या आदेशानुसार, दि.१ जानेवारी १९८६ ते दि. ३१ डिसेंबर २००७ या कालावधीतील चौथ्या वेतन आयोगाची थकबाकी रक्कम दोन महिन्यात अदा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. खंडकऱ्यांना जमीन वाटप प्रक्रियेदरम्यान रामराजे निंबाळकर समितीने कामगारांना चौथ्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी देण्याची शिफारस केली होती. राज्य सरकारने या अहवालाची दखल घेतली असली, तरी प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्यात विलंब झाला. परिणामी, कामगार संघटनांनी सतत पाठपुरावा करूनही वेतनवाढीचा लाभमिळाला नाही. २००९ मध्ये तत्कालीन महसूल मंत्री पतंगराव कदम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत कामगारांच्या देयकांबाबत समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने सुमारे १४२ कोटी रुपयांची देय रक्कम निश्चित केली होती. मात्र, ही रक्कम शासनाला मान्य न झाल्याने तडजोडीअंती ९९ कोटी ५० लाख रुपयांवर सहमती झाली आणि दि. १५ सप्टेंबर २००९ रोजी शासनाने त्यास मान्यता देणारा आदेश काढला. त्यानंतर दि. ६ सप्टेंबर २०११ रोजी १८ कोटी ३४ लाख रुपयांचा काही अंश कामगारांना वितरित करण्यात आला. तरीही उर्वरित रक्कम प्रलंबित राहिल्याने विविध कामगार संघटनांनी २०१९ मध्ये औद्योगिक न्यायालयात दाद मागितली होती. न्यायालयाने आपल्या आदेशात एकूण ५० कोटी ९४ लाख रुपयांच्या थकबाकीतून यापूर्वी अदा केलेले ३ कोटी ४७लाख रुपये वजा करून उर्वरित रक्कम दोन महिन्यात देण्याचे निर्देश दिले आहेत. निर्धारित कालावधीत रक्कम अदा न केल्यास सहा टक्के वार्षिक व्याज देण्याचेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# कोपरगाव पालिकेच्या वतीने 'निर्मल गोदावरी अभियान'

### गोदावरी नदीकाठी कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी आणि नदीकाठ प्लास्टिकमुक्त करण्यासाठी स्वच्छता

**● कोपरगाव । वीरभूमी–**

शहरातील पवित्र गोदावरी नदीकाठी साचलेल्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी आणि नदीकाठ प्लास्टिकमुक्त करून स्वच्छ करण्यासाठी कोपरगाव नगरपरिषदेच्या वतीने रविवार, (दि. ५) एप्रिल रोजी 'निर्मल गोदावरी अभियान' राबविण्यात आले. या उपक्रमाअंतर्गत शहरातील नागरिकांच्या सहभागातून गोदावरी नदीच्या घाटावर साफसफाई करण्यात आली असून युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांनी सादर केलेला विश्वासनामा साकार होत आहे.



या मोहिमेला कोपरगाव शहर वासियांनी मोठा प्रतिसाद देत गोदावरी नदीच्या तिरी स्वच्छता मोहिमेत मोठा हातभार लावला.या स्तुत्य उपक्रमादरम्यान जवळपास १,००० किलो प्लास्टिक व कचरा संकलित करण्यात आला. पुढील काळात नदीचे तीर व घाट स्वच्छ ठेवणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असून, अशा पवित्र स्थळी कोणीही कचरा टाकू नये, नदीला प्रदूषण व प्लास्टिक मुक्त करण्यासाठी सर्वांनी एकत्र यावे तसेच गोदावरी नदी ही कोपरगाववासियांची 'आई' असून तिला स्वच्छ ठेवण्याचा संकल्प सर्वांनी करावा, असे आवाहन नगराध्यक्ष पराग संधान यांच्या वतीने करण्यात आले.

कोपरगाव शहरातील विविध भागांमध्ये नियमित स्वच्छता केली जात असून, त्याच उपक्रमाचा एक भाग म्हणून गोदावरी तीरावर ही मोहीम यशस्वीरित्या राबविण्यात आली. रविवार, ५ एप्रिल रोजी सकाळी साडेसहा वाजल्यापासून नगराध्यक्ष पराग संधान यांच्या प्रमुख उपस्थितीत, तसेच शहरवासीयांच्या सहकार्याने गोदावरी नदीच्या तीरावर साचलेला कचरा व निर्माल्य हटविण्याचे काम करण्यात आले. यावेळी सदगुरू गंगागीर महाराज कॉलेज कोपरगाव येथील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत स्वच्छता मोहिमेला मोलाची मदत केली. तसेच नदीकाठावर साचलेले निर्माल्य संकलित करण्यात आले.

नदीकाठावर साचणारा प्लास्टिक कचरा नागरिकांच्या आरोग्यासाठी अत्यंत घातक असल्याने, येत्या काळात नदीकिनारी स्वच्छता राखणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.याप्रसंगी नगराध्यक्ष पराग संधान, माजी उपनगराध्यक्ष रवींद्र पाठक आरोग्य समिती सभापती वैभव आढाव नगरसेवक अनिल आव्हाड, आकाश वाजे, योगेश बागुल, संजय उदावंत, दत्तू पगारे, गोदामाई प्रतिष्ठानचे संस्थापक आदिनाथ ढाकणे, कैलास खैरे, वैभव गिरमे, राहुल खरात, कलविंदरसिंग डडियाल, राकेश काले, नगरपालिकेचे अधिकारी कर्मचारी तसेच संत सदगुरू गंगागीर महाराज महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. बंडेराव तराळ एन.एस.एस विभागातील विद्यार्थी विद्यार्थिनी, व गोदामाई प्रतिष्ठानचे सदस्य व योगाचर्य विमलताई पुंडे व यांच्यासह सर्व योगसाधक महिला. मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त शहरात ९ एप्रिलला भव्य भीमगीतांचा कार्यक्रम

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अहिल्यानगर शहरात भव्य भीमगीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. नगरसेवक सुरेश भाऊ बनसोडे यांच्या पुढाकारातून होत असलेला हा कार्यक्रम सामाजिक व सांस्कृतिक एकात्मतेचा संदेश देणारा ठरणार आहे.



गुरुवार, दिनांक ९ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळ्यासमोर, पांजारपोळ मैदान, माळीवाडा, अहिल्यानगर येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध गायक आनंद शिंदे यांच्या सादरीकरणातून बाबासाहेबांचा विजय असो, जय भीम म्हणत चला, भीमराजा माझा, निळ्या झेंड्याखाली, भीमाच्या नावानं,

माझा भीमराजा महान, उठा उठा हो भीमसैनिकांनो ही गाणी विशेषत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित भीमगीते सादर होणार असून, उपस्थितांना एक वेगळा सांस्कृतिक अनुभव मिळणार आहे.

कार्यक्रमाचे प्रमुख उद्घाटन शहराचे आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते होणार असून, विविध मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमासाठी आंबेडकरी समाजासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आव्हान जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

नगरसेवक सुरेशभाऊ बनसोडे यांनी समस्त आंबेडकरी समाजाला आवाहन केले आहे की, या भव्य कार्यक्रमाला उपस्थित राहून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना अभिवादन करावे आणि कार्यक्रमाचा आनंद घ्यावा.

## मुस्लीम बांधवांच्या उमुमी इज्तेमाला आ. आशुतोष काळेंनी दिली सदिच्छा भेट

**● कोपरगाव । वीरभूमी–**

तालुक्यातील सुरेगाव, कोळपेवाडी, शहाजापूर, वेळापूर, कोळगाव-थडी आदी गावातील व परिसरातील मुस्लिम बांधवांच्या मागणीनुसार कोपरगाव-राहाता तालुक्यातील मुस्लीम बांधवांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या उमुमी इज्तेमाला आमदार आशुतोष काळे यांनी सदिच्छा भेट देवून मुस्लीम बांधवांशी संवाद साधला व शुभेच्छा दिल्या.



सुरेगाव-शहाजापूर परीसरात दिनांक ०३ व ०४ (शुक्रवार व शनिवार) रोजी कोपरगाव-राहाता तालुक्यातील मुस्लीम बांधवांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला उमुमी इज्तेमा मोठ्या उत्साहात पार पाडला. या उमुमी इज्तेमासाठी कोपरगाव-राहाता तालुक्यातील जवळपास चार ते पाच हजार मुस्लीम बांधव उपस्थित होते. माजी आमदार अशोकराव काळे यांच्या हस्ते उमुमी इज्तेमाच्या मंडप उभारणीच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला होता. आमदार आशुतोष काळे यांनी देखील या उमुमी इज्तेमाला सदिच्छा भेट देवून मुस्लीम बांधवांचा उत्साह वाढविला आणि मुस्लीम बांधवांशी आपुलकीने चौकशी केली.

यावेळी कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन प्रवीण शिंदे, संचालक सूर्यभान कोळपे, माजी उपसभापती व सुरेगाव तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष वाल्मिकराव कोळपे, मा.जि.प.सदस्य बाबासाहेब कोळपे, पद्मविभूषण शरदचंद्र पवार पतसंस्थेचे संचालक ज्ञानेश्वर हाळनोर, पोलीस पाटील इंद्रभान ढोमसे, कोळपेवाडीचे उपसरपंच सागर कोळपे, सदस्य राजू कोळपे, महेश कोळपे, श्रावण शेंडगे आदी मान्यवरांसमवेत सुरेगाव, कोळपेवाडी, शहाजापूर, वेळापूर, कोळगाव-थडी आदी गावातील हजारो मुस्लीम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माजी विद्यार्थी गणेश मरकड यांचेकडून श्रीतिलोक जैन विद्यालयाला ६१ हजारांची २२५ पुस्तके भेट

### श्री तिलोक जैन विद्यालयाचे ग्रंथालय समृद्ध । वाचन संस्कृती रुजवण्याचे आवाहन

**● पाथर्डी । वीरभूमी–**


शहरातील श्री तिलोक जैन विद्यालयाचे माजी विद्यार्थी तथा पुणे येथील समाज कल्याण विभागाचे उपायुक्त गणेश मरकड यांनी आपल्या शाळेबद्दल कृतज्ञता आणि जिव्हाळा व्यक्त करत ग्रंथालय समृद्धीकरण योजनेसाठी तब्बल ६१ हजार रुपये किमतीची २२५ दर्जेदार पुस्तके विद्यालयाला भेट दिली. या उदात्त कार्यामुळे विद्यालयाच्या ग्रंथालयात ज्ञानाचा अमूल्य खजिना वाढला असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नवी दिशा निर्माण झाली आहे.

सदर कार्यक्रमाचे वातावरण अत्यंत उत्साहपूर्ण आणि भावनिक होते. यावेळी आपल्या शालेय आठवणींना उजाळा देत मरकड यांनी प्रेरणादायी विचार मांडले. ते म्हणाले, माझ्या आयुष्यात जे काही साध्य झाले, त्यामागे या विद्यालयाचे संस्कार आणि शिक्षकांचे मार्गदर्शन मोठे आहे. आज मी जे काही देत आहे, ते या संस्थेच्या ऋणातून थोडेफार उतराई होण्याचा एक छोटासा प्रयत्न आहे.

ते पुढे म्हणाले, पुस्तके ही केवळ कागदांची पाने नसून ती जीवनाला दिशा देणारी, विचारांना समृद्ध करणारी आणि व्यक्तिमत्त्व घडवणारी असतात. वाचन करणारा विद्यार्थी कधीही एकटा राहत नाही, कारण प्रत्येक पुस्तक त्याचा खरा मित्र असतो. आजच्या डिजिटल युगातही पुस्तकांचे महत्त्व कमी झालेले नाही, उलट योग्य दिशेने मार्गदर्शन करण्याची ताकद पुस्तकांतच आहे.

विद्यार्थ्यांना उद्देशून त्यांनी सांगितले, दररोज थोडा वेळ जरी वाचनासाठी दिला, तरी तुमच्या विचारांमध्ये, भाषेत आणि आत्मविश्वासात मोठा बदल दिसून येईल. यशस्वी व्हायचे असेल, तर वाचनाची सवय लावा. पुस्तक वाचणारा मनुष्य जीवनात कुठेही अपयशी पडत नाही. तसेच शिक्षकांनाही त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती रुजवण्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमाला संस्थेचे सचिव सतीश गुगळे, विश्वस्त राजेंद्र मुथा, अविनाश मंत्री, प्राचार्य अजय भंडारी, उपमुख्याध्यापक अशोक गर्जे, पर्यवेक्षक भारत गाडेकर, सुधाकर सातपुते, ग्रंथपाल मच्छिंद्र बाचकर, माजी विद्यार्थी संघ समितीचे प्रमुख सुनील कटारिया तसेच समितीचे अध्यक्ष महेश बाहेती, उपाध्यक्ष अभय गांधी, खजिनदार गणेश पैठणकर, अमोल कांकरिया, निलेश खाबिया आदी मान्यवर उपस्थित होते.




यावेळी संस्थेचे सचिव सतीश गुगळे यांनी सांगितले, गणेशराव मरकड यांनी दिलेली ही पुस्तके म्हणजे केवळ भेट नसून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी दिलेला अमूल्य ठेवा आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रंथालय अधिक समृद्ध करण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करू.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सुनील कटारिया यांनी केले, तर प्राचार्य अजय भंडारी यांनी आभार मानले.

# गव्हाणवाडी येथे विमान इंधन चोरीचा पर्दाफाश

## स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई । ८८.५८ लाखांचा मुद्देमाल जप्त; तिघांना अटक, मुख्य सूत्रधार फरार

**● श्रीगोंदा । वीरभूमी–** नगर–पुणे महामार्गावरील गव्हाणवाडी (ता. श्रीगोंदा) येथे विमान इंधन (एटीएफ) चोरी करून त्याचा काळाबाजार करणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला. या कारवाईत तब्बल ८८ लाख ५८ हजार ७७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून तिघांना अटक करण्यात आली आहे.

या प्रकरणातील मुख्य सूत्रधार फरार असून त्याचा शोध सुरू आहे. पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पथक बेलवंडी पोलीस ठाणे हद्दीत गस्त घालत असताना गव्हाणवाडी येथील हॉटेल महाराजाच्या पाठीमागे पत्र्याच्या शेडमध्ये विमान इंधनाचा अवैध साठा केल्याची गुप्त माहिती मिळाली. त्यानुसार उपविभागीय पोलीस अधिकारी प्रवीण लोखंडे यांच्या उपस्थितीत तात्काळ छापा टाकण्यात आला.

छाप्यात इंडियन ऑइल कंपनीच्या टँकरमधून ड्रममध्ये विमान इंधन काढताना तिघे जण रंगेहात सापडले. अटक करण्यात आलेल्यांमध्ये मुकेश रामअकबाल सिंग (वय २६, उत्तर प्रदेश), रामभवन रामतिरथ राजपूत (वय ३२, उत्तर प्रदेश) आणि चंदू शिवराम जांभळकर (वय ४१, गव्हाणवाडी) यांचा समावेश आहे.

तपासात टँकरचे सील तोडून इंधन चोरी करून विक्रीसाठी साठवणूक केली जात असल्याचे उघड झाले. या रॅकेटचा मुख्य सूत्रधार हरीष भिमसिंग (रा. पिंपरी, पुणे) असून तो सध्या फरार आहे. कारवाईदरम्यान पोलिसांनी २८ हजार लिटर व १२ हजार लिटर असे एकूण ४० हजार



लिटर एटीएफ इंधन, एक टाटा टँकर, लोखंडी टिपाडे, प्लास्टिक ड्रम, इंधन काढण्याचे इंजिन व इतर साहित्य असा एकूण ८८.५८ लाखांचा मुद्देमाल जप्त केला.

या प्रकरणी बेलवंडी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांनुसार तसेच जीवनावश्यक वस्तू कायदा व स्फोटके अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.



ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी प्रवीणचंद्र लोखंडे, स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक किरणकुमार कबाडी व बेलवंडी पोलीस ठाण्याचे प्रभारी निरीक्षक नंदकुमार सोनवलकर यांच्या नेतृत्वाखाली पोलीस पथकाने केली आहे.

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या पॅनल विधीज्ञांची नियुक्ती

### ॲड. महेश शिंदे, ॲड. सुरेश लगड, ॲड. शिवाजी कराळे व ॲड. अनिता दिघे यांचा समावेश

**● अहिल्यानगर । वीरभूमी –** जिल्हा व सत्र न्यायालयातंर्गत जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या पॅनल विधीज्ञांची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा व सत्र न्यायाधीश जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष न्यायाधीश शिवाजीराव कचरे व सचिव योगेश पैठणकर यांच्या मार्गदर्शनाखाली या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

या पॅनलमध्ये ॲड. महेश शिंदे, ॲड. सुरेश लगड, ॲड. शिवाजी कराळे व ॲड. अनिता दिघे यांची तीन वर्षासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. सर्व वकिलांच्या सामाजिक व वकीली व्यवसायाच्या कामाची दखल घेऊन त्यांची नियुक्ती झाली आहे.



ॲड. महेश शिंदे ॲड. सुरेश लगड ॲड. शिवाजी कराळे ॲड. अनिता दिघे

ॲड. महेश शिंदे गेल्या पंधरा वर्षांपासून कौटुंबिक न्यायालय, धर्मदाय उपायुक्त कार्यालय येथे वकिली व्यवसाय करीत असून, जय युवा अकॅडमीच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण, बेटी बचाव बेटी पढाव, मोफत आरोग्य शिबिर व स्वच्छता अभियान यासह शासनाचे विविध प्रकल्पात आणि सामाजिक कार्यात जिल्हाभरात कार्य करत आहे.

ॲड. सुरेश लगड हे विशेष सरकारी वकील असून, अनेक वर्षापासून वकिली व्यवसायाचा त्यांना प्रदीर्घ अनुभव आहे. त्याचबरोबर विविध सामाजिक संस्थांना व नवोदित वकिलांना मार्गदर्शन, युवकांचे विविध उपक्रम सातत्याने राबवित असतात. अहमदनगर बार असोसिएशनचे ते माजी अध्यक्ष आहेत. त्यांची फेरनिवड झाली आहे.

ॲड. शिवाजी कराळे हे मागील २५ वर्षापासून वकीली व्यवसाय करत आहे. ते देखील सामाजिक कार्याशी जोडलेले असून, विविध सामाजिक कार्यात त्यांचे योगदान असते. अहमदनगर बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष असून, कौटुंबिक न्यायालयाचे संस्थापक अध्यक्ष आहेत.

ॲड. अनिता दिघे अहमदनगर बार असोसिएशनच्या माजी सचिव असून, आधारवड बहुउद्देशीय संस्थेच्या माध्यमातून महिला व युवतींसाठी विविध उपक्रम राबवित आहेत.

या वकिलांच्या नियुक्तीबद्दल अहमदनगर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. कृष्णा झावरे, उपाध्यक्ष ॲड. भाऊसाहेब घुले, जिल्हा सरकारी वकील ॲड. सतीश पाटील, ॲड. लक्ष्मण कचरे, ॲड. भुषण बऱ्हाटे, ॲड. दिलीपराजे शिंदे, ॲड. शकील पठाण, डॉ. प्रा. रमेश वाघमारे, ॲड. तुषार शेंडगे, ॲड. गायत्री गुंड, ॲड. पोपट बनकर, रजनी ताठे, ॲड. पुष्पा जेजुरकर, ॲड. मनीषा भिंगारदिवे, ॲड. विद्या शिंदे, ॲड. दिनेश शिंदे, ॲड. प्रशांत साळुंके, ॲड. सुनील तोडकर, ॲड. संतोष शिंदे, ॲड. नाझमीन बागवान, ॲड. उमेश गट, ॲड. धनंजय जाधव, ॲड. आरती शिंदे, ॲड. शिवाजी सांगळे आदींनी अभिनंदन केले.

# केडगाव स्थानकात भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव उत्साहात साजरा

**● अहिल्यानगर । वीरभूमी –** केडगाव येथील अंबिकानगर स्थानकाच्या प्रांगणात श्रावक संघ अध्यक्ष पन्नालालजी बोकरीया यांच्या अध्यक्षतेखाली परमपिता भगवान महावीर स्वामी यांच्या जन्मकल्याणक महोत्सवाचा कार्यक्रम यंदाही अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात आणि भक्तिमय जल्लोषात पार पडला. ❋उपप्रवर्तिनी साध्वीरत्न पू.श्री. कंचनकवरजी म.सा., पू.श्री.सुयशाजी म. सा, पू श्री. दिव्ययशाजी म सा, पू.श्री मलयाजी म. सा.

आदि ठाणा यांच्या सानिध्यात हा सोहळा आयोजित करण्यात आला होता. परिसरातील जैन बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महोत्सवाची शोभा वाढवली.

महोत्सवाची सुरुवात झेंडा चौक, भूषणनगर येथून सकाळी शोभायात्रेने झाली. भगवान महावीर स्वामींच्या जयघोषांनी परिसर दुमदुमून गेला होता. विविध सजवलेल्या रथांमधून आणि आकर्षक वेशभूषेत सहभागी झालेल्या भाविकांमुळे शोभायात्रेला विशेष रंगत प्राप्त झाली. महिलांनी लाल साडी तर पुरुषांनी पांढऱ्या वेशभूषेत सहभागी होत पारंपरिक एकात्मतेचे दर्शन घडवले.

शोभायात्रेनंतर स्थानकात प्रवेश होताच पुढील धार्मिक कार्यक्रमांना सुरुवात झाली. या प्रसंगी पाठशाळेतील लहान मुलांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. स्तवन, भजन आणि नवकार महिला मंडळ यांच्या नाटिकेच्या माध्यमातून भगवान महावीरांच्या जीवनातील मूल्ये आणि शिकवण प्रभावीपणे मांडण्यात आली.

यानंतर महासतीजी प.पू. कंचनकवरजी म.सा. यांनी आपल्या प्रवचनातून भगवान महावीरांच्या अहिंसा, सत्य आणि संयम या तत्त्वज्ञानाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी समाजात शांतता, सहिष्णुता आणि सद्भावना टिकवण्यासाठी महावीरांच्या विचारांचे आचरण करण्याचे आवाहन केले. त्यांच्या प्रेरणादायी विचारांनी उपस्थित भाविक भारावून गेले.

कार्यक्रमाच्या शेवटी मंगलपाठ पार पडला. भक्तांनी मोठ्या श्रद्धेने सहभागी होत धार्मिक वातावरणात एकात्मता अनुभवली. त्यानंतर गौतम प्रसादीचे वाटप करण्यात आले, ज्यामध्ये सर्वांनी सहभाग घेतला. प्रसादीचा लाभ घेण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी दिसून आली.

या महोत्सवाचे आयोजन श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ, गुरुदेव युवा मंच, तसेच विविध महिला मंडळांनी संयुक्तपणे केले होते. गेल्या दहा वर्षांपासून या ठिकाणी हा महोत्सव सातत्याने साजरा केला जात असून, दरवर्षी त्यामध्ये अधिकाधिक भक्त सहभागी होत आहेत. संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन आणि व्यवस्थापन अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले.

# संजीवनी पॉलीटेक्निकच्या ८७ विद्यार्थ्यांना बजाज ऑटो मध्ये नोकरी

## संजीवनीमुळे ग्रामीण विद्यार्थी होताहेत वयाच्या १९ व्या वर्षीच कमावते

**● कोपरगाव । वीरभूमी –** संजीवनी के. बी. पी. पॉलीटेक्निकच्या एकाचवेळी ८७ विद्यार्थ्यांना बजाज ऑटो लिमिटेड कंपनीने आकर्षक पगार देऊन नोकरीची संधी दिली. हे विद्यार्थी वयाच्या १९ व्या वर्षी कमावते झाले आहेत. ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या नियोजनबध्द पुढाकारामुळे ही किमया घडली.

बजाज ऑटोने कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन केले होते. यात कंपनीने तृतीय वर्षातील मेकॅनिकल इंजिनिअरींगच्या ३८, मेकॅट्रॉनिक्सच्या १८ व इलेक्ट्रिकल इंजिनिअरींगच्या ३१ विद्यार्थ्यांना नोकरीची संधी मिळाली. अंतिम वर्षाच्या परिक्षेच्या निकाला पूर्वी या विद्यार्थ्यांच्या हाती चांगल्या कंपनीत चांगल्या पगाराच्या नोकरीची ऑर्डर आली. वयाच्या १९ व्या वर्षी करिअर सुरू झाले. यामुळे हे विद्यार्थी व त्यांचे कुटूंबीय आनंदून गेले आहेत.

> संजीवनी पॉलीटेक्निकच्या माध्यमातुन अनेक विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांमध्ये नोकऱ्या मिळवुन देण्यात यश येत आहे. मात्र चालु शैक्षणिक वर्षापसून या पॉलीटेक्निकने ऑटोनॉमस दर्जा प्राप्त केल्यामुळे अधिकाधिक उद्योगाभिमुख शिक्षण देवुन चांगल्या पॅकेजच्या नोकऱ्या ग्रामीण विद्यार्थ्यांना देणे शक्य होणार आहे. संस्थेचा ट्रेनिंग अँड प्लेसमेट विभाग विविध नामांकित कंपन्यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना तांत्रिक तसेच व्यक्तिमत्व विकासाच्या सर्व अंगांनी सक्षम बनवतो. त्यामुळे विद्यार्थी केवळ मुलाखतींसाठी तयार होत नाहीत, तर आत्मविश्वासाने उद्योग विश्वात पाऊल टाकत आकर्षक पॅकेजसह नोकरी मिळवितात. यामुळे केवळ व्यक्ती नव्हे तर ग्रामीण अर्थ व्यवस्थेला नवी उभारी मिळत आहे.
>
> **– अमित कोल्हे,** मॅनेजिंग ट्रस्टी, संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स

संजीवनीचे संस्थापक स्व. शंकरराव कोल्हे यांनी ग्रामीण भागातून परिपूर्ण आणि कुशल अभियंते घडावेत असे स्वप्न पाहीले. त्यांची स्वप्नपूर्ती होते आहे.

संस्थेचे अध्यक्ष श्री. नितिनदादा कोल्हे यांनी या विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले. मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांच्या हस्ते या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य ए. आर. मिरीकर, विभाग प्रमुख प्रा. डी. ए. पाटील,



प्रा. आय. के. सय्यद, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे डीन प्रा.ए. आर. पाबळे आदी उपस्थित होते.